जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४२ दिनांक - १९/०६/२०२३**

**अंमली पदार्थ विराधी पथक-०१ व खंडणी विरोधी पथक-१ यांची संयुक्त कामगिरी**

**गडचिरोली येथुन दोन ट्रॅव्हलिंग बॅगेत गांजा विक्रीसाठी आलेल्या तरुणास केले जेरबंद त्याचेकडुन ७,२७,२००/- रू किचा "३६ किलो ३६० वजनाचा गांजा" हस्तगत**

श्री.रितेश कुमार,पोलीस आयुक्त,पुणे शहर व श्री.संदिप कर्णिक,सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी पुणे शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्याकरीता कोंम्बींग ऑपरेशन,अंमली पदार्थ तस्करी करणारे गुन्हेगार यांची माहिती काढुन कडक कारवाई करण्याच्या सुचना व आदेश दिले आहेत.

वरिष्ठांनी दिलेले आदेश व सुचनानुसार गुन्हे शाखेकडील अंमली पदार्थ विरोधी पथक-०१ व खंडणी विरोधी पथक-०१ येथील अधिकारी व स्टाफ दिनांक १८/०६/२०२३ रोजी पुणे शहरात पेट्रोलिंग करीत असताना,**पोलीस अंमलदार,विजय कांबळे**,खंडणी विरोधी पथक,पुणे यांना भारती विद्यापीठ पो. ठाणे,पुणे कार्यक्षेत्रात एक तरुण मोठया प्रमाणात गांजा विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहिती मिळाली.

त्याअनुषंगाने पेट्रोलिंग करताना दि.१८/०६/२०२३ रोजी पुणे इन्स्टिटयुट आफ एव्हिएशन टेक्नॉलॉजी कॉलेज आंबेगावचे विरूध्द दिशेला शिवगोरक्ष बिल्डिंग समोरील सार्वजनिक रोडवर, आंबेगाव-बुद्रुक,पुणे याठिकाणी इसम **पंकज सलियार मडावी,वय-२३ वर्षे,रा.शिवगोरक्ष व्हिला,आंबेगाव-बुद्रुक,पुणे मुळगांव- मुपो.मसेली,ता.कोर्ची,जि.गडचिरोली** हा त्याचे ताब्यात **७,२७,२००/- रू किचा ३६ किलो ३६० ग्रॅम वजनाचा गांजा** हा अंमली पदार्थ हा दोन वेग-वेगळया ट्रॅव्हलिंग बॅगा मध्ये ठेवुन अनाधिकाराने,बेकायदेशिररित्या विक्री करीता जवळ बाळगताना मिळुन आला आलेला आहे. सदरचे विक्री मध्ये त्याचे इतर साथीदारांचा देखील समावेश असल्याचे निष्पन्न झालेने,सदरबाबत **भारती विद्यापीठ पो.स्टे.पुणे गुरनं.३८४/२०२३,एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम** ८(क),२०(ब)**(ii)**(क),२९ अन्वये दि.१८/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अटक आरोपीस पुढील तपासकामी भारती विद्यापीठ पो.ठाणे,पुणे यांचे ताब्यात दिलेले आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.सह पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री.संदिप कर्णिक,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.अमोल झेंडे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर,श्री.सुनिल पवार यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक-०१ व खंडणी विरोधी पथक-०१,गुन्हे शाखा,पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,अजय वाघमारे, सहा.पोलीस निरीक्षक,शैलजा जानकर, पोउनि.विकास जाधव, यशवंत ओंबासे पोलीस अंमलदार,विजय कांबळे, रविंद्र फुलपगारे, दुर्योधन गुरव, सुजित वाडेकर, पांडुरंग पवार, प्रविण उत्तेकर, राजेंद्र लांडगे यांनी केली आहे.